GRAVISS
HOSPITALITY
QUALITY·PASSION·INNOVATION

February 13, 2026

To,
The Manager,
Department of Corporate Services,
Bombay Stock Exchange Limited.
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai – 400 001.

**Scrip Code: 509546**

Dear Sir,

**Sub: Newspaper Publication of Un-Audited Financial Results (Standalone and Consolidated) for the quarter ended December 31, 2025.**

**Ref:- Regulation 47 read with Regulation 30 of SEBI (Listing - Obligations and Disclosure Requirements) Regulations, - 2015 - Newspaper Publication of Un-Audited Financial Results.**

Please find attached copies of the Newspaper Publication of the Un-Audited Financial Results (Standalone & Consolidated) for the quarter ended December 31, 2025 duly published by the Company in Financial Express (English) and Sakal (Marathi) dated February 13, 2026.

Kindly take note of the above.

Thanking you.

**Yours truly,**

**For GRAVISS HOSPITALITY LIMITED**

GRAVISS HOSPITALITY LIMITED MUMBAI

**Jalpa G. Modi**

**Company Secretary and Compliance Officer.**

GRAVISS HOSPITALITY LTD.
(FORMERLY KNOWN AS THE GL HOTELS LIMITED)
CIN: L55101PN1959PLC012761
REGISTERED OFFICE: PLOT NO. A/ 4-5, KHANDALA MIDC PHASE II, KESURDI, KHANDALA, SATARA - 412801
ADMIN OFFICE: STRAND CINEMA, 1st Floor, Arthur Bunder Road, Colaba, Mumbai - 400 005.
T 91.22.6251 3131 E: graviss.corporate@gravissgroup.com
www.gravissgroup.com

## LYKIS LIMITED

CIN: L74999MH1984PLC413247

Registered Office: 4th Floor, Grandeur Building, Veera Desai Road, Opp. Gundecha, Symphony, Andheri - West, Mumbai- 400053, Maharashtra, India

Tel: +91 22 4069 4069 | Fax: +91 22 3009 8128 | E-mail: cs@lykis.com | Website: www.lykis.com

The Un-Audited (Standalone and Consolidated) Financial Result for the quarter and nine months ended December 31, 2025 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company in the meeting held on February 12, 2026. The complete Un-Audited (Standalone and Consolidated) Financial Result for the quarter and nine months ended December 31, 2025 have been filed under Regulation 33 of SEBI (LODR) Regulation, 2015 with the stock exchange and are available on the website of the stock exchange at www.bseindia.com and Company's website www.lykis.com.

The same can be accessed by scanning the QR code.

By order of Board of Directors
For Lykis Limited
Sd/-
Mr. Nadir Umedali Dhrolia
Managing Director
DIN: 03303675

Place: Mumbai
Date : February 12, 2026

## KCI

## KANORIA CHEMICALS & INDUSTRIES LIMITED

Registered Office: "KCI Plaza", 23C, Ashutosh Chowdhury Avenue, Kolkata – 700 019
Phone: (033) 4031 3200, CIN: L24110WB1960PLC024910
Email: investor@kanoriachem.com Website: www.kanoriachem.com

**Statement of Financial Results (Standalone & Consolidated) for the quarter and nine months ended 31st December, 2025.**

The Board of Directors of the Company in their meeting held on 12th February, 2026, approved the financial results of the company for the quarter and nine months ended 31st December, 2025 ("Financial Results").

The Financial results along with the Audited results have been hosted on the Company's website at **https://a.storyblok.com/f/209886/x/d62240b18e/financial-results__qdec-2025.pdf**, websites of the stock exchanges i.e., National Stock Exchange of India Limited at **https://nsearchives.nseindia.com/corporate/KANORICHEM_12022026164100_Results.pdf**, BSE Limited at **https://www.bseindia.com/xml-data/corpfiling/AttachLive/d28403b2-59b6-4c70-8ad4-3bbc6a0675a3.pdf** and can also be accessed by scanning the QR code:

For and on behalf of the Board
R.V. Kanoria
Chairman & Managing Director
(DIN:00003792)

Date : 12th February, 2026
Place : New Delhi

## GRAVISS HOSPITALITY LIMITED

GRAVISS HOSPITALITY QUALITY-PASSION-INNOVATION

CIN: L55101PN1959PLC012761

Regd office: Plot no. A4 & A5, Khandala MIDC, Phase II, Kesurdi, Khandala, Satara- 412 801 (Maharashtra).

**Extract of unaudited Financial Results for the Quarter and nine months ended December 31, 2025**

Rs in Lakhs

| Sr No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | | | Year ended | Quarter ended | | | Year ended |
| | | 31-12-2025 | 30-09-2025 | 31-12-2024 | 31-03-2025 | 31-12-2025 | 30-09-2025 | 31-12-2024 | 31-03-2025 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited | Unaudited | Unaudited | Unaudited | Audited |
| 1 | Total Income from operations (net) | 1,877 | 1,189 | 1,721 | 5,725 | 1,931 | 1,243 | 1,821 | 6,317 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period before Tax | 381 | (155) | 284 | 458 | 326 | (210) | 220 | 214 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period after Tax | 355 | (74) | 205 | 1,192 | 299 | (129) | 141 | 939 |
| 4 | Other Comprehensive Income (after tax) | - | - | - | 1 | - | - | - | 1 |
| 5 | Total Comprehensive Income (after tax) | 355 | (74) | 205 | 1,193 | 299 | (129) | 141 | 940 |
| 6 | Equity Share Capital | 1,410 | 1,410 | 1,410 | 1,410 | 1,410 | 1,410 | 1,410 | 1,410 |
| 7 | Earning Per Share (of Rs. 2/- each) (not annualized) | | | | | | | | |
| | (1) Basic (Rs): | 0.50 | (0.10) | 0.29 | 1.69 | 0.42 | (0.18) | 0.20 | 1.33 |
| | (2) Diluted: (Rs): | 0.50 | (0.10) | 0.29 | 1.69 | 0.42 | (0.18) | 0.20 | 1.33 |

**Note:**

The above Unaudited standalone and consolidated results for the quarter and nine months ended 31 December, 2025 which have been prepared in accordance with Regulation 33 of SEBI(Listing and Disclosure Requirements) Regulations, 2015 and subjected to review by the Statutory Auditors of the Company and were reviewed by the Audit Committee of the Board of Directors and the Board of Directors at their meeting held on 12-02-2026.

The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulation, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Company's website www.gravisshospitality.com and Stock Exchange website(www.bseindia.com).

For Graviss Hospitality Limited
Sd/-
Romil Ratra
CEO & Whole Time Director

Mumbai
Date : 12-02-2026

## DCX SYSTEMS LIMITED

Reg. Off. Address: Aerospace SEZ Sector, Plot Nos.29, 30 and 107, Hitech Defence and Aerospace Park, Kavadadasanahalli, KIADB Industrial Area, Bengaluru Rural, Karnataka, India, 562110
CIN: L31908KA2011PLC061686 Telephone: + (91) (80) 67119527

**UN-AUDITED STANDALONE AND CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED DECEMBER 31, 2025**

The Board of Directors of the Company at their meeting held on February 12, 2026, has approved the un-audited standalone and consolidated financial results of the Company for the quarter and nine months ended December 31, 2025.

The financial results along with the Limited Review Report of the Statutory Auditors thereon are available on the Company's website at https://dcxindia.com/wp-content/uploads/2026/02/Outcome_BM.pdf and can also be accessed by scanning the Quick Response ('QR') Code.

For and on behalf of the Board of Directors
Sd/-
Dr. H S Raghavendra Rao
Chairman and Managing Director
DIN: 00379249

Place : Bengaluru
Date : 12.02.2026

Powered by INFRA.MARKET

SHALIMAR PAINTS SINCE 1902

## SHALIMAR PAINTS LIMITED

CIN: L24222HR1902PLC065611

Registered Office: Stainless Centre, 4th Floor, Plot No. 50, Sector 32, Gurugram, Haryana 122001
Corporate Office: Olethia Business Spaces, Plot No. A184 and A185, Road No. 16Z, Opposite Ashar IT Park, Wagle Industrial Estate, Thane, Maharashtra 400604
Email: askus@shalimarpaints.com; Website: www.shalimarpaints.com; Toll Free: 1800 103 6509

**Statement of Unaudited Financial Results (Standalone and Consolidated) for the Quarter and Nine Months ended December 31, 2025**

The Board of Directors at its meeting held on Thursday, February 12, 2026, has approved the Unaudited Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the Quarter and Nine Months ended December 31, 2025.

The Unaudited Financial Results alongwith the Limited Review Report have been uploaded on the Company's Website at https://www.shalimarpaints.com/investors-relations/quarterly-reports and can be accessed by scanning the below QR code:

For and on behalf of the Board of Directors
Kuldip Raina
Managing Director & CEO
DIN: 10956069

Place: Mumbai
Date: 12.02.2026

Note: The above intimation is in accordance with Regulation 33 read with regulation 47(1) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

Karma Energy

## KARMA ENERGY LIMITED

CIN L31101MH2007PLC168823

**Regd. Off.** Empire House, 214, Dr. D. N. Road, Ent. A. K. Nayak Marg, Fort, Mumbai – 400 001
Email : karmaenergy@weizmann.co.in; Website : www.karmaenergy.co

**STATEMENT OF UN-AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTH ENDED 31ST DECEMBER, 2025**

The Board of Directors of the Company, at their meeting held on February 12, 2026 approved the Un-Audited Financial Results of the Company for the quarter and period ended 31st December, 2025.

The results, along with the Limited Review Report of the Auditors have been posted on the Company's website at https:www.karmaenergy.co and can be accessed by scanning the QR code.

**By Order of the Board**
**For KARMA ENERGY LIMITED**
**Sd/-**
**Chetan D. Mehra**
**Managing Director (DIN:00022021)**

Place : Mumbai
Date : 12th February, 2026

**Note :** The above intimation is in accordance with Regulation 33 read with regulation 47 of SEBI (Listing Obligation & Disclosure Requirements) Regulations, 2015

WEIZMANN LIMITED

CIN:L65990MH1985PLC038164

**Regd. Office : 214, Empire House, Dr. D. N. Road, Ent. A. K. Nayak Marg, Fort, Mumbai – 400 001.**
**Website: www.weizmann.co.in, Email: contact@weizmann.co.in**
**Tel. Nos :022-22071501 ( 6 lines) Fax No.: 022-22071514**

**STATEMENT OF UN-AUDITED FINANCIAL RESULTS (STANDALONE AND CONSOLIDATED) FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31ST DECEMBER, 2025**

The Board of Directors of the Company, at the meeting held on 12th February, 2026 approved the Un-Audited Financial Results (Standalone and Consolidated) of the Company for the quarter and nine months ended 31st December, 2025.

The results along with the Auditor's Report have been posted on the website of the Company https://weizmann.co.in/financial-results.html and can be accessed by scanning the QR Code.

**For Weizmann Limited**
**SD/-**
**Dharmendra G Siraj**
**Chairman**
**DIN: 00025543**

**Place: Mumbai**
**Date: 12th February, 2026**

*Note: The above intimation is in accordance with Regulation 33 read with Regulation 47(1) of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015*

## STANLEY LIFESTYLES LIMITED

**CIN:** L19116KA2007PLC044090
**Registered Office:** SY No. 16/2 and 16/3 Part, Hosur Road, Veerasandra Village, Attibele Hobli, Anekal Taluk Bengaluru, Karnataka- 560100
**Telephone:** + 91-80 6895 7200; **E-mail:** compliance@stanleylifestyles.com;
**Website:** www.stanleylifestyles.com

**STATEMENT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS (STANDALONE & CONSOLIDATED) FOR THE QUARTER ENDED DECEMBER 31ST 2025**

The Board of Directors of the Company, at the Meeting held on February 12th 2026, approved the unaudited financial results of the Company for the quarter ended December 31st 2025 ("Financial Results").

The Financial Results along with the Limited Review Report, have been posted on the Company's website at https://www.stanleylifestyles.com/investors/financials and can also be accessed by scanning the QR code.

For and on behalf of the Board of Directors of
Stanley Lifestyles Limited
Sd/-
Sunil Suresh
Managing Director
DIN: 01421517

Date: February 12th 2026
Place: Bengaluru

**Note:** The above intimation is in accordance with Regulation 33 read with Regulation 47(1) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

CONCEPT

## MUKTA ARTS LIMITED

CIN:L92110MH1982PLC028180
Regd. Office : Mukta House, Behind Whistling Woods Institute, Filmcity Complex, Goregaon (East), Mumbai- 400 065.Tel. No. (022) 33649400. Website : www.muktaarts.com

**STATEMENT OF UNAUDITED (STANDALONE AND CONSOLIDATED) FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31ST DECEMBER, 2025**

The Unaudited (Standalone and Consolidated) Financial Results for the quarter and nine months ended 31st December, 2025 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company in their respective meetings held on Thursday, 12th February, 2026.

The complete Unaudited (Standalone and Consolidated) Financial Results for the quarter and nine months ended 31st December, 2025 have been filed with the stock exchanges under Regulation 33 of the SEBI (LODR) Regulations, 2015 and are also available on the Company's website https://muktaarts.com/ and can be accessed by scanning the QR Code.

For Mukta Arts Limited
Rahul Puri
Managing Director
DIN:01925045

Place: Mumbai
Date: 12th February, 2026

Back



# अण्वस्त्र नियंत्रणाचा ढासळता कणा

**अमेरिका आणि रशिया या दोन देशांची अण्वस्त्रांवर नियंत्रण आणणारा 'न्यू स्टार्ट' करार संपल्याने १९७२नंतर पहिल्यांदाच या दोन देशांच्या अण्वस्त्रांवर कोणतीही कायदेशीर बंधने राहिलेली नाहीत. वाढती शस्त्रास्त्रस्पर्धा, आधुनिक युद्धतंत्र आणि चीनचे आव्हान यांमुळे जगावर अण्वस्त्रयुद्धाचे सावट असून, भारतासाठीही नवे धोरणात्मक पेच निर्माण झाले आहेत.**



■ **हर्ष काबरा**

भारतीय वेळेनुसार ५ फेब्रुवारीला पहाटे रशिया आणि अमेरिका यांच्यातील 'न्यू स्टार्ट' (स्ट्रॅटेजिक आर्म्स रिडक्शन ट्रिटी) हा शेवटचा सामरिक शस्त्रकपात करार मुदत संपल्याने इतिहासजमा झाला. शीतयुद्धाच्या काळापासून वेगवेगळ्या करारांच्या अनुषंगाने सुरू असलेले त्यांचे द्विपक्षीय आण्विक सहकार्य आणि निर्बंधही संपुष्टात आले. जगात १९८६मध्ये सुमारे ७० हजार ४०० अण्वस्त्रे होती. १९६९मध्ये सुरू झालेल्या स्ट्रॅटेजिक आर्म्स लिमिटेशन टॉक्स ('साल्ट') या शस्त्रमर्यादा वाटाघाटींपासून न्यू स्टार्टपर्यंतच्या करारांच्या सातत्यपूर्ण मालिकेमुळे ती संख्या आज १२ हजार ५००पर्यंत खाली आली आहे. परंतु आता हे सुरक्षा कवच निखळत आहे की काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. अमेरिका आणि सोव्हिएत युनियन दरम्यान १९९१मध्ये झालेल्या मूळ 'स्टार्ट' कराराची जागा २०१०मध्ये बराक ओबामा आणि दिमित्री मेदवेदेव यांनी स्वाक्षरी केलेल्या या कराराने घेतली. यात दोन्ही देशांवर प्रत्येकी १,५५० तैनात अण्वस्त्रांची, ८०० लाँचर्सची, आणि ७०० आंतरखंडीय व पाणबुडीतून डागल्या जाणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची, तसेच अवजड बॉम्बर विमानांची मर्यादा घालण्यात आली. वर्षातून दोनदा शस्त्रास्त्रांची माहिती देणे, परस्परांच्या लष्करी तळांची १८ वेळा प्रत्यक्ष पाहणी करणे आणि समस्या सोडवण्यासाठी द्विपक्षीय आयोगाच्या बैठका घेणे अशा तरतुदींमुळे दोन्ही देशांमध्ये परस्पर विश्वासाची पायाभरणी झाली. मात्र २०२१मध्ये पाच वर्षांनी वाढवलेल्या या कराराला पुन्हा वाढ देण्याची कायदेशीर तरतूद नव्हती.

### अण्वस्त्रांची नवी शर्यत

डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' धोरणामुळे अनेक आंतरराष्ट्रीय करार मोडीत निघाले असतानाच, रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी या कराराला मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव सप्टेंबर २०२५मध्ये मांडला होता. ट्रम्प यांनी त्यावेळी सकारात्मक प्रतिसाद दिला खरा, पण प्रत्यक्षात कोणतीही कृती केली नाही. ट्रम्प यांनी अनेकदा जगातील अण्वस्त्रांची संख्या कमी करण्याबाबत भाष्य केले आहे. रशिया तयार असल्यास अगदी अण्वस्त्रे पूर्णपणे नष्ट करण्याची इच्छाही त्यांनी बोलून दाखवली आहे. प्रत्यक्षात त्यांनी अण्वस्त्र धोरण हाताळणाऱ्या मुत्सद्यांची संख्या कमी करत 'न्यू स्टार्ट'च्या बाबतीत 'हा करार संपला तरी चालेल, आम्ही यापेक्षा चांगला करार करू,' अशी भूमिका घेतली आहे.अनुभवी अधिकाऱ्यांना बाजूला सारून मोजक्या व्यक्तींच्या हातात निर्णय प्रक्रिया एकवटल्यामुळे अमेरिकेची जटिल आंतरराष्ट्रीय वाटाघाटींची क्षमता क्षीण झाली आहे. रशिया आणि चीनची आक्रमकता पाहता अमेरिकेची अण्वस्त्रे वाढवण्यासाठी ट्रम्प यांच्यावर अंतर्गत राजकीय दबावदेखील वाढत आहे. तीन दशकांनंतर पुन्हा अण्वस्त्र चाचण्या सुरू करण्याचे ट्रम्प यांचे सूतोवाच याचेच फलित आहे. रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर मॉस्कोने याआधीच प्रत्यक्ष पाहणीची प्रक्रिया थांबवली होती.

अंकुश नसल्यास अमेरिका आणि रशिया आपली अण्वस्त्रे अनुक्रमे ६० आणि ११० टक्क्यांनी वाढवू शकतात. 'न्यू स्टार्ट'च्या अटी पाळण्यासाठी अमेरिकेने २०१४मध्ये एकाच क्षेपणास्त्रावरून अनेक अण्वस्त्रे डागण्याची 'एमआयआरव्ही' यंत्रणा काढून टाकली होती, पण आता त्याच्या पुनरुज्जीवनाचा विचार करत आहे. ट्रम्प यांनी परवानगी दिल्यास, पेंटागॉन कोठारातील अण्वस्त्रे बाहेर काढून ती ४०० आंतरखंडीय क्षेपणास्त्रांवर पुन्हा तैनात करू शकते.

### बहुपक्षीय कराराची गुंतागुंत

याशिवाय, अमेरिकेच्या प्रस्तावित 'गोल्डन डोम' या प्रगत क्षेपणास्त्र संरक्षण यंत्रणेमुळे परिस्थिती अधिकच गुंतागुंतीची झाली आहे. अमेरिकेने आपले संरक्षण कवच मजबूत केले, तर रशिया आणि चीन आपली अण्वस्त्रे वाढवण्यावर निश्चितच भर देतील. गेल्या आठवड्यातच रशियाच्या उपपरराष्ट्र मंत्र्यांनी इशारा दिला की, अमेरिकेने ग्रीनलँडमध्ये 'गोल्डन डोम' तैनात केल्यास मॉस्को प्रत्युत्तरादाखल लष्करी व तांत्रिक उपाययोजना करण्यास सज्ज आहे.अमेरिकी अण्वस्त्रसाठ्यातील काही प्रणाली आता कालबाह्य होऊ लागली आहेत. काही शस्त्रास्त्रे ५० वर्षांहून अधिक जुनी आहेत. याउलट, मागील दशकात रशियाने आपल्या ताफ्याचे झपाट्याने आधुनिकीकरण करत आपल्या अण्वस्त्रवाहू क्षमतेत मोठी वाढ केली आहे. 'पोसायडन'सारखा आंतरखंडीय, अण्वस्त्र-सज्ज व अणुऊर्जेवर चालणारा पाण्याखालील स्वायत्त टॉर्पेडो, 'ब्युरवेस्टनिक' क्रूझ क्षेपणास्त्र, तसेच ध्वनीच्या पाचपट वेगाने मारा करणारी हायपरसोनिक शस्त्रास्त्रे विकसित केली आहेत, जी न्यू स्टार्ट कराराच्या कक्षेबाहेर आहेत. 'ओरेश्निक'सारख्या प्रगत क्षेपणास्त्रांचा युक्रेन युद्धादरम्यान प्रत्यक्ष वापरही केला आहे. रशियाने वारंवार अणुयुद्धाच्या धमक्या देऊन आणि युक्रेनमधील अणुऊर्जा प्रकल्पांचा लष्करी कामासाठी वापर करून पाश्चिमात्य देशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे.

आज चीन, फ्रान्स आणि ब्रिटनकडे अण्वस्त्रे आहेत, तर भारतासह पाकिस्तान, इस्त्राईल आणि उत्तर कोरिया हे कोणत्याही जागतिक कराराबाहेर अण्वस्त्रे बाळगून आहेत. ट्रम्प यांनी कोणत्याही नव्या करारात चीनला सामील करण्याचा आग्रह धरला आहे. तांत्रिकदृष्ट्या हे योग्य वाटत असले तरी व्यवहारात अडथळा ठरू शकते. सेंटर फॉर आर्म्स कंट्रोल अँड नॉन-प्रोलिफरेशन या अमेरिकी संशोधन संस्थेच्या मते चीनकडे सध्या सुमारे ६०० अण्वस्त्रे आहेत, जी अमेरिकेच्या आणि रशियाच्या प्रत्येकी ५,०००हून अधिक अण्वस्त्रांच्या तुलनेत खूपच कमी आहेत. यामुळे चीनने अशा कोणत्याही चर्चेत सहभागी होण्यास नकार दिला आहे. मात्र, गेल्या एका वर्षातच आपली अण्वस्त्रे १५ टक्क्यांनी म्हणजे सुमारे ९० ने वाढवत चीन आता जगातील तिसरी मोठी अण्वस्त्रधारी शक्ती बनला आहे. दुसरीकडे, पुतीन यांनी ब्रिटन आणि फ्रान्सलाही नव्या करारात सामील करून घेण्याची मागणी केली आहे.

१९१ देशांचा सहभाग असलेला अण्वस्त्र प्रसारबंदी करार (एनपीटी) अस्तित्वात असला, तरी सुमारे ९० टक्के अण्वस्त्रे अमेरिका व रशियाकडे असल्याने 'न्यू स्टार्ट' महत्त्वाचा होता. त्याकडे उभय देशांनी पाठ फिरवणे म्हणजे अण्वस्त्र नियंत्रणातून माघारीचा विसंगत संदेश होय. सध्याच्या तणावपूर्ण वातावरणात शून्यातून नवीन करार तयार करणे कठीण आहे, कारण त्यासाठी तांत्रिक व्याख्या, शस्त्रास्त्रांची मोजणी आणि तपासणी यावर सहभागी देशांमध्ये किमान विश्वासाची गरज असते. तज्ज्ञांनी ट्रम्प यांना कराराला एक वर्षाची मुदतवाढ देऊन प्रत्यक्ष पाहणी पुन्हा सुरू करण्याचा सल्ला दिला होता, जेणेकरून मूळ चौकटीत दोन्ही देशांच्या परतीसाठी तसेच चीनला सामील करून घेण्यासाठी वेळ मिळाला असता.

### अण्वस्त्र नियंत्रणाचे भविष्य

शस्त्रास्त्र नियंत्रण ही केवळ द्विपक्षीय बाब नसून, संपूर्ण जगाच्या सुरक्षेशी निगडित मुद्दा आहे. प्रभावी अण्वस्त्र नियंत्रणाच्या दृष्टीने अमेरिका आणि रशियासोबत इतर अण्वस्त्रधारी देशांनाही थेट संपर्क आणि संवाद यंत्रणेत सामील करून घेणे आवश्यक आहे. मान्यताप्राप्त अण्वस्त्रधारी 'पी-५' देशांनी, अर्थात संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या पाच कायमस्वरूपी सदस्यांनी तरी युद्ध टाळण्यासाठी, धोरणात्मक स्थिरता राखण्यासाठी आणि परस्पर विश्वास वाढवण्यासाठी उच्चस्तरीय चर्चा सुरू ठेवणे आवश्यक आहे. अण्वस्त्रांच्या मर्यादांवर लगेच एकमत झाले नाही, तरी लष्करी धोरणे आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर नियमित संवाद झाल्यास चुकीच्या समजुतींमुळे उद्भवणाऱ्या जोखमी टाळता येतील. 'न्यू स्टार्ट' करारांतर्गत असलेल्या सल्लागार यंत्रणांमुळे परस्परांच्या शस्त्रसज्जतेबाबतच्या शंका दूर करणे आणि नव्या लष्करी प्रणालींवर सखोल चर्चा करणे शक्य झाले होते. मात्र, या कराराच्या समाप्तीमुळे हे विश्वासनिर्मितीचे व्यासपीठच नाहीसे झाले आहे.

सोव्हिएत युनियनचे १९९१मध्ये विघटन झाले तेव्हा युक्रेनकडे जगातील तिसरा सर्वांत मोठा अण्वस्त्र साठा होता. त्यानंतर युक्रेनने अण्वस्त्रमुक्तीचा मार्ग स्वीकारून एक आदर्श ठेवला असला, तरी अनेकांच्या मनात आज प्रश्न आहे की जर युक्रेनने आपली अण्वस्त्रे सोडली नसती, तर आजच्या युद्धात परिस्थिती वेगळी असती का? अनेक दशकांनंतर युरोप पुन्हा एकदा अण्वस्त्र स्पर्धेच्या उंबरठ्यावर उभा आहे. युरोपीय मित्रराष्ट्रांनी पोलंडसारख्या देशांच्या अण्वस्त्र संरक्षणाच्या सतत मागणीची दखल घेत आता खंडासाठी स्वतंत्र 'अणुछत्र' उभारण्याबाबत चर्चा सुरू केली आहे. हे वाढीव अविश्वासाचे लक्षण आहे आणि अविश्वासाचे परिणाम घातकच ठरतात.

न्यू स्टार्टचा शेवट एक धोकादायक वळणबिंदू आहे. अणुशस्त्रे खरोखरच महाविनाश रोखत आहेत की त्याला केवळ पुढे ढकलत आहेत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. शांततेला संहारक शस्त्रांची कुबडी लागावी, ही मुळातच एक बोचरी विडंबना आहे. प्रज्ञा आणि संयम यांचे चिरंतन धडे हिरोशिमा आणि नागासाकीच्या निमित्ताने आपल्याला याआधीच मिळाले आहेत. मानवी अस्तित्वात अण्वस्त्रांचे स्थान गौण करण्याचा पर्यायही आपल्या हातात आहे. सद्यपरिस्थितीत याचे भान ठेवणे कितीतरी अधिक निकडीचे झाले आहे.

**(लेखक आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक आहेत.)**

### भारतासमोरील आव्हान

■ **भारताची अण्वस्त्र सज्जता प्रामुख्याने आधी वापर न करण्याचे धोरण आणि विश्वासार्ह किमान प्रतिबंधक क्षमता या तत्त्वांवर आधारित आहे. सध्या भारताकडे सुमारे १८० अण्वस्त्रे असल्याचा अंदाज आहे. चीनला आपली शस्त्रसंख्या वाढवण्यास प्रोत्साहन मिळाल्यास भारताच्या किमान प्रतिबंधक मर्यादेवर दबाव येईल. भारताला उत्तर म्हणून पाकिस्तानदेखील आपल्या अण्वस्त्रांची संख्या वाढवेल. अशा प्रकारची शस्त्रास्त्र स्पर्धा दक्षिण आशियातील अण्वस्त्र युद्धाच्या धोक्याला नवे आयाम देऊ शकते. एकीकडे स्वदेशी तंत्रज्ञान, क्षेपणास्त्र आधुनिकीकरण आणि थोरियम आधारित अणुभट्ट्यांच्या नियोजनाद्वारे भारत आपली क्षमता वाढवत असला, तरी दुसरीकडे अण्वस्त्र प्रसार रोखण्याच्या जागतिक वचनबद्धतेचा वारंवार पुनरुच्चार करत आला आहे. बदलत्या भूराजकीय परिस्थितीचा सामना करण्यासाठी भारताने कोणत्याही द्विपक्षीय करारात न अडकता आपल्या प्रतिबंधक धोरणात वैविध्य आणणे गरजेचे झाले आहे.**

# 'शुल्क कपातीचा वस्त्रोद्योगासही लाभ'



**पीयूष गोयल**

**नवी दिल्ली, ता. १२ :** अमेरिकेचा कच्चा माल वापरून भारतात बनविलेले कापड आणि तयार कपड्यांच्या निर्यातीवर अमेरिकेत शून्य आयात शुल्क आकारले जाईल, अशी घोषणा आज केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी केली. बांगलादेशाप्रमाणे भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्रालाही अमेरिकेकडून हा लाभ मिळू शकतो, असे गोयल यांनी म्हटले आहे.

भारत-अमेरिकादरम्यानच्या अंतिम व्यापार करारावर स्वाक्षरी करताना वस्त्रोद्योग क्षेत्राला शून्य आयात शुल्काची सुविधा मिळण्याचा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला. ''अंतरिम व्यापार करारात या प्रस्तावाचा समावेश करण्यात आला नसला तरी अंतिम करारात ही तरतूद बघायला मिळेल. अमेरिकेकडून कापूस आणि अन्य कच्चामाल खरेदी करून कापडाचे उत्पादन करून ते अमेरिकेला निर्यात केल्यास बांगलादेशाप्रमाणे भारतालाही शून्य आयातशुल्काची सुविधा मिळेल,'' असे गोयल म्हणाले. वस्त्रोद्योगावर शून्य टक्के आयातशुल्क जाहीर झाल्यास कापड निर्यातदारांना दिलासा मिळणार आहे. बांगलादेश वस्त्रोद्योग क्षेत्राला अटी आणि शर्तींवर शून्य आयात शुल्क आकारणाऱ्या अमेरिकेने भारतीय वस्त्रोद्योग क्षेत्रावर १८ टक्के आयात शुल्क आकारले आहे. भारतातून अमेरिकेत कापड आणि तयार कपड्यांची सुमारे एक लाख कोटींची निर्यात होत असून बांगलादेशाला झुकते माप दिल्यामुळे भारतीय कापड निर्यातदारांपुढे मोठे आव्हान उभे झाले आहे.

### राहुल यांचा दावा खोडला

अमेरिकेसोबतच्या व्यापार करारात भारताच्या तुलनेत बांगलादेशला अधिक लाभ झाल्याचा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा दावा गोयल यांनी खोडून काढला. तथ्यहीन विधाने केल्याबद्दल राहुल गांधींनी देशवासीयांची माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली. भारतीय शेतकरी आणि मच्छिमारांच्या कृषी आणि सागरी उत्पादनांची अमेरिका, युरोपियन संघटना, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये भारतातून मोठ्या प्रमाणावर निर्यात होणार असून त्याचा आकडा पाच लाख कोटींवरून दहा लाख कोटी होईल, असे गोयल यांनी सांगितले.

# शिवचरित्राइतका महान ग्रंथ जगात नाही

**मंगळवेढा, ता. १२ :** शिवचरित्रामध्ये लढायचे कसे, पाडायचे कसे, याचबरोबर महिलांचे रक्षण कसे करायचे, कृषी विकास कसा करायचा, स्वराज्य कसे घडवायचे आदी सर्व बाबींची माहिती आहे. त्यामुळे जगाच्या पाठीवर शिवचरित्राइतका दुसरा महान ग्रंथ कोणताही नाही, असे प्रतिपादन मराठा आरक्षण लढ्याचे प्रमुख मनोज जरांगे-पाटील यांनी केले.

येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी शिवजयंती कार्यक्रमानिमित्त आयोजित मूर्ती प्रतिष्ठापनेवेळी ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्षा सुनंदा आवताडे, नगरसेवक सोमनाथ अवताडे, माजी अध्यक्ष रामचंद्र वाकडे, भीमराव मोरे, माऊली पवार, पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, मंडळ अधिकारी धनंजय इंगोले आदींसह मंडळाचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तत्पूर्वी शहरातून शिवप्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर मूर्तीची प्रतिष्ठापना मनोज जरांगे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

## भारत ११४ 'राफेल' खरेदी करणार

» पान १ वरून

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन हे पुढील महिन्यामध्ये भारत भेटीवर येणार असून त्यावेळी या विमानांच्या करारावर स्वाक्षरी करण्यात येईल, असे सूत्रांकडून सांगण्यात आले. संरक्षण साहित्य बनविणारी फ्रान्सची आघाडीची कंपनी 'डसॉल्ट एव्हिएशन' कडून राफेल विमानांची निर्मिती केली जाते. सध्या हवाई दलाच्या ताफ्यात ३६ विमाने आहेत. ही विमाने अंबाला, प. बंगाल आणि हासिमारा येथे तैनात आहेत.

## अहिल्यानगरला भूकंपसदृश हादरे

**अहिल्यानगर, ता. १२ :** नगर शहरात गुरुवारी (ता. १२) रात्री १० वाजण्याच्या दरम्यान हलक्या स्वरूपात भूकंपसदृश हादरे जाणवले. याबाबत जिल्हा आपत्ती अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे यांनी या वृत्ताबाबत काही जणांचे फोन आल्याची माहिती दिली. मात्र, याबाबत अधिकृत प्रशासकीय पातळीवरून कोणतीही माहिती उपलब्ध झाली नसल्याचे सांगितले.

नगर शहरामध्ये साधारण १० वाजण्याच्या दरम्यान हलक्या स्वरूपात भूकंपसदृश हादरे जाणवले. यामुळे प्रशासकीय कार्यालयात अनेकांनी फोन करून विचारणा केली; परंतु कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही. शहरात अनेक नागरिकांनी एक दुसऱ्याला फोन करून याची अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनाही संपूर्ण माहिती मिळू शकली नाही.

## किरकोळ महागाई २.७५ टक्क्यांवर

**मुंबई, ता. १२ :** ग्राहक किंमत निर्देशांकाच्या नव्या मालिकेनुसार जानेवारी महिन्यातील किरकोळ महागाईचा दर २.७५ टक्क्यांवर पोचल्याचे आज केंद्र सरकारतर्फे जाहीर करण्यात आले. यासाठी २०२४ हे वर्ष आधार म्हणून निश्चित करण्यात आले आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयातून ही आकडेवारी जाहीर करण्यात आली. चलनवाढीचे संपूर्ण चित्र स्पष्ट व्हावे या उद्देशाने या प्रक्रियेतील वस्तूंची संख्या २५९ वरून ३०८ वर नेण्यात आली आहे. सेवांची संख्या ४० वरून ५० करण्यात आली आहे.

# राहुल गांधींचे सदस्यत्व रद्द करा

» पान १ वरून

'राहुल गांधी हे जॉर्ज सोरोस, यूएस एड, फोर्ड फाउंडेशन यांच्यासह सर्व भारतविरोधी शक्तींसोबत हातमिळवणी करून देशाचे तुकडे करू इच्छितात. या शक्तींना हाताशी धरून ते देशाची दिशाभूल करीत असून लष्करी मनोधैर्याचे देखील खच्चीकरण करत आहेत. त्यामुळे या प्रस्तावावर चर्चा करून राहुल यांचे लोकसभा सदस्यत्व संपुष्टात आणावे आणि भविष्यात निवडणूक लढविण्यावर देखील त्यांच्यावरबंदी घालावी,' अशी मागणी दुबे यांनी केली आहे. 'लोकसभा अध्यक्षांनी हा प्रस्ताव स्वीकारावा म्हणून त्यांना विनंती केली आहे,' असेही दुबे म्हणाले. दुबे यांचा प्रस्ताव स्वीकारला जाऊन त्यावर सभागृह कोणता, निर्णय घेते याकडे लक्ष लागले आहे. निवडणूक प्रचारात अपशब्द वापरल्याबद्दल गुजरात उच्च न्यायालयाने राहुल यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यामुळे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी २३ मार्च २०२३ रोजी राहुल यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द केले होते. पण सर्वोच्च न्यायालयाने गुजरातमधील न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिल्यामुळे त्यांचे सदस्यत्व पुन्हा बहाल करण्यात आले आहे. राहुल यांना दरम्यानच्या काळात '२- तुघलक लेन' या बंगल्याचा ताबा सोडून द्यावा लागला होता.

> देशवासीयांनी राहुल गांधींचे म्हणणे बघितले असून त्यांची खात्री पटली आहे. केंद्र सरकारने त्यावर प्रतिसाद द्यायला हवा होता. निशिकांत दुबे त्यावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत आहेत.
>
> - **के.सी.वेणुगोपाल**, काँग्रेसचे सरचिटणीस

### हक्कभंग प्रस्ताव बारगळला

राहुल गांधी यांनी बुधवारी अर्थसंकल्पावर केलेल्या भाषणावरून त्यांच्याविरुद्ध हक्कभंग प्रस्तावाची नोटीस देण्याचा मोदी सरकारचा विचार होता. संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी तसे जाहीरही केले होते. पण तो विचार रद्द करून आज भाजपच्यावतीने राहुल गांधी यांच्याविरुद्ध निशिकांत दुबे यांच्यावतीने व्यापक प्रस्ताव मांडण्याची घोषणा करण्यात आली.

### राहुल माध्यमांवर भडकले

निशिकांत दुबे यांच्या प्रस्तावावर प्रतिक्रिया मागणाऱ्या माध्यम प्रतिनिधींवर राहुल गांधी हे चांगलेच भडकले. ''तुम्ही तुमचे काम करा. तुम्ही भाजपचे पूर्णवेळ कर्मचारी नाही आहात. किमान थोडे तरी निष्पक्षपणे काम करण्याचा प्रयत्न करा. हे खूपच लाजिरवाणे होत चालले आहे, असे तुम्हाला वाटत नाही का? तुम्ही जबाबदार लोक आहात. तुम्ही माध्यमांमध्ये काम करता.'' अशा शब्दांत राहुल यांनी सुनावले.

### व्यापार कराराच्या निषेधार्थ निदर्शने

काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षाच्या खासदारांनी आज संसदेचे कामकाज सुरू होण्यापूर्वी संसद भवन परिसरात'मकर'द्वारासमोर आंदोलन केले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, के.सी.वेणुगोपाल, प्रियांका गांधी- वद्रा देखील आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

# मिठीही मारू; पण ते जवळ घेतील का?

» पान I वरून

मुख्यमंत्र्यांच्या या बैठकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात शिवेंद्रसिंहराजे, शंभूराज देसाई उपस्थित होते. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना शंभूराज देसाई आणि शिवेंद्रसिंहराजे यांची जुगलबंदी रंगली.

जिल्हा परिषद निवडणुकीत भाजप २७, राष्ट्रवादी २०, तर शिवसेना १५ असे संख्याबळ आहे, त्यामुळे सत्ता स्थापनेसाठी शिवसेनेच्या हातात सत्तेच्या चाव्या असल्याचे निकालातून स्पष्ट झाले होते. त्यानंतर आज प्रथमच शिवेंद्रसिंहराजे आणि शंभूराज देसाई हे एकत्रित माध्यमांसमोर आले. त्यामध्ये निवडणुकीपूर्वी असलेले तणावपूर्ण वातावरण आता निवळल्याचे दिसून आले. माध्यमांनी शिवेंद्रसिंहराजे भोसलेंना निवडणुकीपूर्वीच्या बैठकीला अनुपस्थित राहिल्याबाबत विचारले असता ते म्हणाले, "शंभूराज देसाई यांनी थेट मला बोलाविले असते, तर नक्की आलो असतो. त्यांचा निरोप व्हाया व्हाया आल्याने घोटाळा झाला. आता सत्ता स्थापनेच्या चर्चेबाबत शंभूराज देसाई यांनीच सांगावे. आमचा पक्ष आकड्याने मोठा असला, तरी शंभूराज मोठे आहेत. निवडणुकीपूर्वी वातावरण चांगले नव्हते; आता वातावरण चांगले आहे.'' जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्र येण्याची आमची भूमिका आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही आता एकत्र आहोत, बाकी नंतर बघू, असे त्यांनी सांगितले.

### आपण आलात आता मुख्यमंत्री येतील

ऑनलाइन बैठक सुरू होण्यापूर्वी मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले जिल्हाधिकारी कार्यालयात आले. त्या वेळी शंभूराज देसाई यांनी त्यांच्याकडे पाहात 'आपण आलात, आता तिकडे मुख्यमंत्री बैठकीला येतील, तुमचे मुख्यमंत्र्यांशी थेट कनेक्शन आहे, आमचा कसा अधूनमधून संपर्क तुटतो,' असे म्हणत मिस्कील टिप्पणी केली.


ग्रॅव्हिस हॉस्पिटॅलिटी लिमिटेड

GRAVISS HOSPITALITY — QUALITY·PASSION·INNOVATION

CIN : L55101PN1959PLC012761

नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट नं. ए४ आणि ए५, खंडाळा एमआयडीसी, फेज-II, केसुर्डी, खंडाळा, सातारा - ४१२ ८०१ (महाराष्ट्र)

**३१ डिसेंबर २०२५ अखेर तिमाही आणि नऊमाहीसाठी अलेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे सार**

(₹ लाखांमध्ये)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाहीअखेर | | | वर्षाअखेर | तिमाहीअखेर | | | वर्षाअखेर |
| | | ३१-१२-२०२५ | ३०-०९-२०२५ | ३१-१२-२०२४ | ३१-०३-२०२५ | ३१-१२-२०२५ | ३०-०९-२०२५ | ३१-१२-२०२४ | ३१-०३-२०२५ |
| | | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | अलेखापरीक्षित | लेखापरीक्षित |
| १ | कार्यवाहीपासूनचे एकूण उत्पन्न (निव्वळ) | १,८७७ | १,१८९ | १,७२१ | ५,७२५ | १,९३१ | १,२४३ | १,८२१ | ६,३१७ |
| २ | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | ३८१ | (१५५) | २८४ | ४५८ | ३२६ | (२१०) | २२० | २१४ |
| ३ | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) करानंतर | ३५५ | (७४) | २०५ | १,१९२ | २९९ | (१२९) | १४१ | ९३९ |
| ४ | इतर एकत्रित उत्पन्न (करानंतर) | - | - | - | १ | - | - | - | १ |
| ५ | एकूण एकत्रित उत्पन्न (करानंतर) | ३५५ | (७४) | २०५ | १,१९३ | २९९ | (१२९) | १४१ | ९४० |
| ६ | समभाग भांडवल | १,४१० | १,४१० | १,४१० | १,४१० | १,४१० | १,४१० | १,४१० | १,४१० |
| ७ | प्रती भाग मिळकत- (रु.२ प्रत्येकी ) (वार्षिक नसलेली) | | | | | | | | |
| | (१) बेसिक रु. | ०.५० | (०.१०) | ०.२९ | १.६९ | ०.४२ | (०.१८) | ०.२० | १.३३ |
| | (२) डिल्युटेड रु. | ०.५० | (०.१०) | ०.२९ | १.६९ | ०.४२ | (०.१८) | ०.२० | १.३३ |

सूचना :

३१ डिसेंबर २०२५ अखेर तिमाही आणि नऊमाहीसाठी वरील अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित परिणाम जे सेबी (लिस्टिंग अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमन २०१५ च्या नियमन ३३ सह संबंधितमध्ये तयार करण्यात आलेले आहेत आणि कंपनीच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या पुनरावलोकनाच्या संबंधित आहेत आणि संचालक मंडळाच्या १२-०२-२०२६ रोजीच्या बैठकीत आणि संचालक मंडळाच्या लेखा समितीद्वारे पुनरावलोकन केलेले आहेत.

सेबी (लिस्टिंग अँड ऑदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमन २०१५ च्या नियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजसह भरण्यात आलेल्या तिमाही आर्थिक परिणामांच्या तपशिलवार स्वरुपाचे वरील सार आहे. तिमाही आर्थिक परिणामाचे संपूर्ण स्वरुप कंपनीचे संकेतस्थळ www.gravisshospitality.com आणि स्टॉक एक्स्चेंजचे संकेतस्थळ (www.bseindia.com) वर उपलब्ध आहे.

मुंबई
दिनांक : १२-०२-२०२६

ग्रॅव्हिस हॉस्पिटॅलिटी लिमिटेडकरिता
सही
रोमिल रात्रा
सीईओ आणि पूर्णवेळ संचालक








